गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांकरिता सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्राची स्थापना.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक इएमपी १४९१/१२१३/(२९६/९१)सेयो:२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई:४०० ०३२,
दिनांक: २० जानेवारी, १९९४

शासन निर्णय:- गडचिरोली जिल्ह्याच्या जलद विकासाकरिता शासनाने मंजूर केलेल्या विशेष कृती कार्यक्रमांतर्गत गडचिरोली येथे सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरिता सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यास तसेच या केंद्रात लघुलेखन / टंकलेखनाचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त केंद्राकरिता खालील प्रमाणे नवीन पदे मंजूर करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पद | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | उप प्रादेशिक सेवायोजन अधिकारी (राजपत्रित) | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० |
| २. | कनिष्ठ सेवायोजन अधिकारी | १ | १४००-४०-१६००-५०-२३००-दरो-६०-२६०० |
| ३. | लघुलेखन/टंकलेखन प्रशिक्षक | १ | " " |
| ४. | लिपिक | १ | ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० |
| ५. | टंकलेखक | १ | " " |
| ६. | शिपाई | १ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० |

...२

३. उपरोक्त केंद्रासाठी खालीलप्रमाणे साहित्य व टंकलेखन खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | साहित्य/सामग्री | खर्च लाख |
| --- | --- | --- |
| १. | टंकलेखन यंत्रे मुद्रणास | ००.२२ लाख |
| २. | फर्निचर | ००.२५ लाख |
| | एकूण रुपये: | ००.४७ लाख |

४. वरील परिच्छेद (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्मचारी/अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते, प्रासंगिक मानधन इत्यादि बाबीसाठी चालू आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीसाठी रु.००.१३ लाख व परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे टंकलेखन यंत्रे खरेदीसाठी रु.००.४७ लाख असा एकूण रुपये ००.६० लाखाचा खर्च, ""२२३०-कामगार व सेवायोजन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२-सेवायोजन सेवा(२) ... प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्राची स्थापना करणे (२२३००७५९), मागणी क्रमांक टी-७" या लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कि. वा. जाधव )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता व लेखापरीक्षा) नागपूर.

सेवायोजन उपसंचालक, विभागीय कार्यालय, नागपूर.

जिल्हा कोषाधिकारी, गडचिरोली.

उप प्रादेशिक सेवायोजन अधिकारी, उप प्रादेशिक सेवायोजन कार्यालय, गडचिरोली.

आदिवासी विकास विभाग (कार्यासन १०) मंत्रालय, मुंबई.

वित्त विभाग (व्यय-५) मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, सेवा-७